**मुख्य महाव्यवस्थापक(प्रवसु) यांचे कार्यालय,**
प्रशिक्षण व सुरक्षा प्रविभाग, मराविविकंम, चेमरी नं. १,
एनटीपीएस कॉलनी, एकलहरे, नाशिक (महाराष्ट्र)-४२२ १०५
फोन नं. ०२५३-२८१००४०(का), २८१२९४४(वै ), फॅक्स नं. २८१०१७५
Email: cetrd@mahadiscom.in

**जा. क्रं. मुमव्य/प्रवसु/एकलहरे/नाशिक/ No - 0632 दिनांक 23 MAR 2016**

# परिपत्रक

**विषय : व्याख्याता साठी सुधारीत मानधना बाबत.**

संदर्भ : १. प्रशासकीय परिपत्रक मुं. ३४ दि. ०५.०४.२००६.
२. परिपत्रक CE/TRD/TRG/१९३० दि. १०.०८.२००७.

महावितरण कंपनीच्या धोरणानुसार, सद्यास्थितीत वेतनगट २,३,४ मधील कर्मचारी व अधिकारी यांना विविध विषयांचे व गरजेनुसार प्रशिक्षण देण्याचे कार्य (प्रवसु) एकलहरे केंद्र व त्या अंतर्गत येणाऱ्या सांगली, औरंगाबाद, अमरावती व नाशिक या चार विभागीय प्रशिक्षण केंद्रामार्फत केले जाते. सदर प्रशिक्षणाकरीता बाहयस्त्रोत व्याख्याता, कंपनीतील निवृत्त कर्मचारी /अधिकारी यांना दिड तासाच्या तासीकेसाठी परिपत्रक क्र.CE/TRD/TRG/१९३० dt. १०.०६.२००७ नुसार मानधन अदा करण्यांत येत होते. म्हणून सन २००७ पासून ते आतापर्यंतच्या कालावधीचा विचार करता व्याख्याता मानधन वाढ होण्यासाठी सातत्याने मागणी केली जात होती. म्हणुन या कार्यालयाकडुन मुख्य कार्यालयास तसा प्रस्ताव सादर केला गेला होता.

सदरचा प्रस्ताव महावितरण कंपनीच्या व्यवस्थापना पुढे प्रशिक्षणाचा दर्जा व त्याची प्रत उत्कृष्ट राहावी या उद्देशाने विचाराधिन होता. आता सदर प्रस्तावास मा. व्यवस्थापकीय संचालक, मुख्य कार्यालय, मुंबई यांनी मान्यता दिली आहे. कार्यालयीन टिपण्णी दि. २३.०२.२०१६ नुसार ०१ एप्रिल २०१६ पासून प्रशिक्षण व सुरक्षा केंद्र नाशिक व त्याअंतर्गत येणाऱ्या सांगली, औरंगाबाद, अमरावती व नाशिक या चार प्रादेशिक केंद्रामध्ये प्रशिक्षण देणाऱ्या बाहयस्त्रोत व्याख्याता, महावितरण कंपनीतील कार्यरत अधिकारी / कर्मचारी (प्रशिक्षण व सुरक्षा केंद्र व प्रादेशिक केंद्रामध्ये कार्यरत असलेले कर्मचारी वगळून) यांना दर दीड तासाच्या तासिकेसाठी खालील प्रमाणे सुधारीत मानधन देण्यास मंजुरी प्रदान करण्यात आलेली आहे.

| बाहयस्त्रोत व्याख्याता, कंपनीतील कार्यरत अधिकारी / कर्मचारी व निवृत्त अधिकारी / कर्मचारी (प्रशिक्षण व सुरक्षा केंद्रातील व प्रादेशिक केंद्रातील अधिकारी / कर्मचारी वगळुन) | मानधन (१.३० तासाच्या व्याख्यानासाठी) रुपये |
|---|---|
| अधिक्षक अभियंता समकक्ष व त्यावरील अधिकारी | १०००/- |
| अतिरिक्त कार्यकारी अभियंता समकक्ष व त्यावरील अधिकारी | ७००/- |
| उपकार्यकारी अभियंता समकक्ष व त्याखालील अधिकारी | ५००/- |

तथापी जिल्हा स्तरावरील लघु प्रशिक्षण केंद्रात येणाऱ्या व्याख्यातासाठी प्रचलीत परिपत्रक क्र.CE/TRD/GAD/TRG/1930 दि.१०.०८.२००७ तसेच प्रशासकीय परिपत्रक २३४ दि. २०.०६.२००५ अटी व शर्ती नुसाराचे दर पूर्वी प्रमाणे राहतील.

पान नं २ वर.....

या ठिकाणी असे नमुद करण्यात येते की, प्रचलीत कार्यपध्दती प्रमाणे बाहयस्त्रोत व्याख्याता आणि आधिकारी यांना व्याख्याता म्हणून मंजुरी देण्याचे अधिकार मुख्य महाव्यवस्थापक (प्रवसु) एकलहरे यांच्या अधिपत्याखालील समीती घेईल. सदर समीती मध्ये (प्रवसु) चे दोन कार्यकारी अभियंता, उप महाव्यवस्थापक (मासं) व वरीष्ठ व्यवस्थापक (वित्त व लेखा) हे राहतील. सदर परिपत्रक दिनांक ०१.०४.२०१६ पासुन आमंलात येईल.

सदर परिपत्रक अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक तथा सक्षम अधिकारी यांचे मान्यतेनुसार प्रसारीत करण्यात येत आहे. हे परिपत्रक महावितरण कंपनीच्या www.mahadiscom.in या संकेत स्थळावर उपलब्ध आहे.

23/3/16

(कां वि अजनाळकर)
मुख्य महाव्यवस्थापक
(प्रवसु) एकलहरे, नाशिक

प्रत सविनय सादर :

- संचालक, (प्रकल्प)
  सांघीक कार्यालय, मुंबई.
- मा. संचालक (संचलन),
  सांघीक कार्यालय, मुंबई.
- मा. संचालक (वित्त),
  सांघीक कार्यालय, मुंबई.
- मा. कार्यकारी संचालक (मासं ),
  सांघीक कार्यालय, मुंबई.

प्रत रवाना : १) मा. व्यवस्थापक संचालक यांचे विशेष अधिकारी, सांघीक कार्यालय मुंबई.
२) अतिरीक्त कार्यकारी अभियंता, प्रादेशिक प्रशिक्षण केंद्र अमरावती, सांगली, औरगांबाद, नाशिक.

प्रति,
सर्व मुख्य अभियंते
......माहीती करिता